आजचा सुविचार

कोणतेही कार्य अडथळ्याशिवाय
पार पडत नाही.
शेवटपर्यंत जे प्रयत्न करतात,
त्यांनाच यश प्राप्त होते...

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २६६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०८ मे २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## तुफान आलंया...कल्याणमध्ये वादळी वाऱ्याचं थैमान



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, कल्याण :** निसर्गामध्ये अचानक झालेल्या बदलांमुळे दिवा, डोंबिवली, कल्याण, मलंगगड परिसर आणि ग्रामीण भागात चारच्या सुमारस धुळीचे वादळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शहरावर पसरलेल्या या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता ही मोठ्या प्रमाणात खालावल्याचं बोललं जात आहे. असेच धुळीचे वादळ मागच्या आणि त्याच्या मागच्या वर्षी सुद्धा आलं होतं. उन्हाळ्यात असे वादळ येत असून हे तिसरं वर्ष आहे.

**सोसाट्याचा वारा अन् धुळीचं वादळ...**

महाराष्ट्राच्या विविध भागात ढगाळ वातावरण तसेच अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्यातर्फे वर्तवण्यात आला होता. सद्या परिस्थिती पाहता हे सर्व खरं होताना दिसत आहे. राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाची हजेरी लागली असून कल्याण, डोंबिवली, दिवा आणि आसपासच्या ग्रामीण परिसरात आज सकाळपासूनच वातावरणात उकाडा होता. त्यातच आद दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास अचानक सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे ठाणे जिल्हातील काही शहर आणि ग्रामीण परिसर काही काळ धुळीच्या चादरी आड झाकोळली गेली होती.

**शहरातील हवेची गुणवत्ता खालावली...**

जोरदार वाऱ्यांमुळे ठाणे जिल्ह्यातील काही शहरामध्ये रस्त्यांवर, इमारतींवर, झाडांवर साचलेली धूळ मोठ्या प्रमाणात हवेत उडाल्याने काही काळ दृश्यमानता कमी झाली होती आणि मोठ्या प्रमाणावर हे धुळीचे लोट उठले होते. दरम्यान, शहरावर पसरलेल्या या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता ही मोठ्या प्रमाणात खालावल्याचं बोललं जात आहे. परिणामी श्वसन आजार असणाऱ्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास झालाय, तर रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना आणि बाईकवरून जाणाऱ्या प्रवाशांना ह्याचा त्रास झाला.

**कल्याणचा लोकग्रामचा रेल्वे पादचारी पूल ढसाढसा रडतोय**

कल्याणच्या लोकग्रामच्या पादचारी रेल्वे पूल २०१८ साली रेल्वे प्रशासानकडून पाडण्यात आला होता. या रेल्वे पादचारी पुलाच्या जागेवर नवा पादचारी पूल होईल, अशी माहिती समोर आली होती. पण या रेल्वे पादचारी पुलाचं काम पूर्ण होण्यासाठी अजूनही सर्वसामान्य नागरिकांना वाट पाहावी लागत आहे. विशेष म्हणजे जवळपास सहा वर्षे हा रेल्वे पादचारी पूल अदृश्य होता.

रेल्वे पादचारी पूल आज होईल, उद्या होईल, अशी आशा घेऊन लाखो नागरीक दररोज रेल्वे पूल जिथे जमिनदोस्त करण्यात आला होता त्या जागेवरुन रेल्वे रुळ पार करुन पायपीट करत जात होते. आतादेखील प्रवाशांची तीच अवस्था आहे.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणारा आरोपी पुण्यातून अटकेत



**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०७, राहुरी :** घरात एकटी असलेल्या १४ वर्षीय अल्पवयीन मुलीचा गैरफायदा घेत तिची छेड काढून विनयभंग करणाऱ्या आरोपीस राहुरी पोलिसांनी पुण्यातून अटक केली आहे.

या प्रकरणी अय्याज उर्फ वसीम अक्रम आयुब पठाण (वय २२) याच्याविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २९१/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता कलम ७४, ७५, ७८, ७९ तसेच बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम (POCSO) कलम ८ व १२ अन्वये ३० मार्च २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आरोपी पसार झाला होता.

आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी दोन पथके नियुक्त केली होती. मात्र, एक महिना उलटूनही आरोपीबाबत ठोस माहिती मिळत नव्हती. दरम्यान, ६ मे रोजी रात्री पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांना गोपनीय माहिती मिळाली की आरोपी पुणे येथे लपून बसला आहे.

या माहितीच्या आधारे वरिष्ठांच्या परवानगीने पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव यांच्या पथकाने पुणे शहरात सापळा रचून रात्री सुमारे २ वाजता आरोपीस ताब्यात घेतले. त्यानंतर त्यास राहुरी पोलीस ठाण्यात आणून अटक करण्यात आली.

आरोपीस पुढील कारवाईसाठी सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे हजर करण्यात आले असून पोलिस कोठडीची मागणी करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, अपर पोलिस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. या कारवाईत पोउपनि. राजू जाधव, पोहेकॉ. सुरज गायकवाड, संभाजी बडे, पोकॉ. गणेश लिपने, संतोष शिंदे, प्रमोद ढाकणे, अंकुश जाधव, संतोष दरेकर (सायबर सेल) यांचा सहभाग होता. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक राजू जाधव व पोकॉ. गणेश लिपने करीत आहेत.

## माथेरान तहानलेले एम जे पी च्या गलथान कारभारामुळे नागरिक संतप्त!



शारलोट लेक वरील पंपिंग मशीन बंद झाल्याने ताबडतोब आम्ही स्वखर्चाने दुरुस्तीसाठी पाठवली. वॉटर पाईप येथील पंप बसवून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. संबंधित अधिकारी वर्गाशी सातत्याने चर्चा करून लवकरच पाण्याच्या समस्येवर तोडगा काढण्यात यावा अशा सूचना केल्या आहेत. त्यामुळे या हंगामात पुरेसे पाणी मिळण्याची शक्यता आहे. नागरिकांनी सुध्दा पाण्याचा जपून वापर करावा.

**- चंद्रकांत चौधरी (नगराध्यक्ष माथेरान)**

---

सन २०२३, २४, २५ या वर्षात नेरळची पाण्याची पंपिंग सरासरी १५ तास चालत होती. जी आता जेमतेम आठ ते दहा तासावर आली आहे यामध्ये नेमके काय गौडबंगाल आहे. याची प्रामुख्याने चौकशी होणे गरजेचे आहे.

**- सिताराम कुंभार (विरोधी पक्षनेते माथेरान नगरपालिका)**

**अक्षराज :** चंद्रकांत सुतार

**दि.०७,** माथेरान (रायगड) : पर्यटन हंगाम तोंडावर असतानाही माथेरानकरांना तीव्र पाणीटंचाईला सामोरे जावे लागत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (चगझ) ढिसाळ आणि निष्क्रिय कारभाराविरोधात नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार, नगरसेवक सचिन दाभेकर, किरण पेमारे यांच्यासह सामाजिक कार्यकर्त्यांनी थेट जलशुद्धीकरण केंद्रावर धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारला. मात्र नेहमीप्रमाणे अभियंता कार्यालयात अनुपस्थित असल्याने नागरिकांचा रोष अधिकच वाढला.

नेरळ येथील उल्हास नदीतून माथेरानसाठी पाण्याचा उपसा केला जातो. मार्गावर तीन पंप असूनही अपेक्षित प्रमाणात पंपिंग होत नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जुम्मापट्टी येथे १६ तास पंपिंग होत असताना माथेरानसाठी केवळ ८ ते १० तास पंपिंग का? असा सवाल उपस्थित होत आहे. मागील दोन दिवस तर अवघी ८ तास पंपिंग करण्यात आल्याने शहरात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.

दरम्यान, माथेरान लेकमध्ये अजून ३२ फूट पाणीसाठा असला तरी गेली तीन ते चार वर्षे तलावाची स्वच्छता न झाल्याने तब्बल १५ फूट गाळ साचल्याचे समोर आले आहे. फिल्टर हाऊसमध्ये सफेद रेतीच संपल्याने दूषित पाणीपुरवठा होत असल्याची धक्कादायक बाबही पुढे आली आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे नेरळ ते माथेरान पाईपलाईनवर अनेक ठिकाणी अनधिकृत जोडण्या करून पाण्याची खुलेआम चोरी होत असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे नागरिक भरमसाठ पाणीबिले भरत असताना दुसरीकडे पाण्याची चोरी रोखण्यात चगझ पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप ग्रामस्थ करत आहेत.

२०२१ ते २०२५ दरम्यान १५ तास पंपिंग होत असताना सध्या केवळ ६ ते ७ तास पंपिंग होत असल्याने शहराला आवश्यक असलेले १८ लाख लिटर पाणी मिळत नाही. एका तासाला फक्त ९० हजार लिटर पाणी मिळत असल्याने अनेक भागांत हप्त्यातून एक दिवस पाणी कपात लागू करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी केवळ एक ते दीड तास कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे.

पंप वारंवार नादुरुस्त होत असल्याने शार्लोट लेकवर अवलंबून राहावे लागत आहे. मात्र या तलावाची पातळीही झपाट्याने घटली असून गाळ वजा करता केवळ २० फूट पाणी शिल्लक आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत परिस्थिती आणखी गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अनधिकृत जोडण्या तात्काळ काढा, पंपिंग वाढवा आणि पाणीचोरी रोखा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संतप्त माथेरानकरांनी दिला आहे.

## शिंदेंच्या हेलिकॉप्टरचं इमर्जन्सी लँडिंग थोडक्यात अनर्थ टळला



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टर ला वादळाचा फटका बसला आहे. सोसाट्याचा वारा आणि धुळीच्या वादळामुळे एकनाथ शिंदे यांच्या हेलिकॉप्टरचं एमर्जन्सी लँडिंग करण्यात आलं. एकनाथ शिंदे मुंबईहून मुरबाडला जात होते. एका लग्न सोहळ्यासाठी उपमुख्यमंत्री मुरबाडला निघाले होते. पण त्यांच्या हेलिकॉप्टरला वादळाचा तडाखा बसला. पायलटनं प्रसंगावधान राखत हेलिकॉप्टर मुंबईच्या दिशेनं वळवलं. जुहूतील विमानतळावर हेलिकॉप्टर लँड करण्यात आलं.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुंबईतील महालक्ष्मी रेसकोर्सवरुन हेलिकॉप्टरनं निघाले होते. मुरबाडमध्ये एका लग्न सोहळ्यासाठी शिंदे हेलिकॉप्टरनं मुरबाडला निघाले. पण कल्याण परिसरातील धुळीच्या वादळाचा फटका शिंदेंच्या हेलिकॉप्टरला बसला. या कठीण प्रसंगात पायलटनं समयसूचकता दाखवली. हेलिकॉप्टर जवळपास १० ते १५ मिनिटं धुळीच्या वादळात अडकलं होतं. पायलटनं प्रसंगावधान दाखवत हेलिकॉप्टर पुन्हा मुंबईच्या दिशेनं वळवलं. जुहूतील विमानतळावर हेलिकॉप्टर सुरक्षित लँड झाले. शिंदे आणि त्यांच्या सोबत हेलिकॉप्टरमध्ये असलेले सगळे सुरक्षित आहेत. पायलटच्या प्रसंगावधानानं मोठा अनर्थ टळला आहे.

**कल्याण, डोंबिवलीत धुळीचं वादळ**

निसर्गामध्ये अचानक झालेल्या बदलांमुळे दिवा, डोंबिवली, कल्याण, मलंगगड परिसर आणि ग्रामीण भागात चारच्या सुमारास धुळीचे वादळ आलं. शहरावर पसरलेल्या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात खालावल्याचं बोलल जात आहे.असंच धुळीचं वादळ गेल्या वर्षीही आलं होतं. महाराष्ट्राच्या विविध भागात ढगाळ वातावरण तसंच अवकाळी पावसाचा अंदाज हवामान खात्यातर्फे वर्तवण्यात आला होता. सद्य परिस्थिती पाहता तो खरा होताना दिसत आहे. राज्यात काही ठिकाणी अवकाळी पावसानं हजेरी लागली असून कल्याण, डोंबिवली, दिवा आणि आसपासच्या ग्रामीण परिसरात आज सकाळपासूनच वातावरणात उष्णता वाढली होती. त्यातच दुपारी चार वाजण्याच्या सुमारास अचानक सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे ठाणे जिल्हातील काही शहर आणि ग्रामीण परिसरात काही काळ धुळीच्या चादरी आड झाकोळली गेली होती.

जोरदार वाऱ्यांमुळे ठाणे जिल्ह्यातील काही शहरामध्ये रस्त्यांवर, इमारतींवर, झाडांवर साचलेली धूळ मोठ्या प्रमाणात हवेत उडाल्यानं काही काळ दृश्यमानता कमी झाली होती. दरम्यान, शहरावर पसरलेल्या या धुळीमुळे शहरातील हवेची गुणवत्ता मोठ्या प्रमाणात खालावली आहे. परिणामी श्वसनाचे आजार असणाऱ्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास झाला आहे.

## मिरा-भाईंदरमध्ये डॉ.आंबेडकरांचा अवमान; गुन्हा दाखल




**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०७, मिरा-भाईंदर :** येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर प्रवेशद्वारावरील महामानवाचा नामफलक अनधिकृत बॅनरने झाकून त्यांचा अवमान केल्याप्रकरणी वंचित बहुजन आघाडीने पुकारलेल्या १२ तासांच्या तीव्र ठिय्या आंदोलनानंतर प्रशासनाला अखेर नमते घ्यावे लागले. या प्रकरणी भाईंदर पोलीस ठाण्यात संबंधित व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरच्या मुख्य प्रवेशद्वारावर महामानवाचा नामफलक आहे. मात्र या फलकावर मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या माजी महापौर डिंपल मेहता आणि आमदार नरेंद्र मेहता यांचे छायाचित्र असलेले अनधिकृत बॅनर लावून मूळ नाव पूर्णतः झाकून टाकण्यात आले होते. या कृत्यामुळे स्थानिक आंबेडकरी अनुयायांमध्ये संतापाची लाट उसळली होती. या घटनेची दखल घेत वंचित बहुजन आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला. प्रशासनाने केवळ बॅनर हटवून कारवाईची औपचारिकता पूर्ण करण्याचा प्रयत्न केला.

मात्र जोपर्यंत दोषींवर गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत मागे न हटण्याचा निर्धार करत कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्याबाहेर ठिय्या मांडला.

वंचित बहुजन आघाडीसह विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरल्याने प्रशासनावर प्रचंड लोकदबाव निर्माण झाला. यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

या आंदोलनात अध्यक्ष इकबाल महाडिक, अनिल भगत, ताहीर महाडिक, साजिद शेख, इम्रान शेख, फैज शेख, यास्मिन खान, अस्मिता कदम, शाकीला शेख, नसरीन खान, जयबुनिशा खान, उमेश शिंदे, पंकज इंगोले, राहुल डोईफोडे, पीटर डिसोजा, दिलीप भालेराव, सुभाष ठोंबरे, सिद्धार्थ वानखेडे यांच्यासह मोठ्या संख्येने भीमसैनिक व नागरिक उपस्थित होते.




## इराणच्या अणुक्षमतेचा स्रोत

इस्रायल आणि अमेरिका यांच्या नेतृत्वाखालील संघर्षाने इराणविरुद्ध वाढत चाललेला तणाव अमेरिकेच्या परिप्रेक्ष्यामधून एकाच मुद्द्याभोवती फिरतो आहे, तो म्हणजे इराणची कथित अण्वस्त्र महत्त्वाकांक्षा. युरेनियम समृद्धीकरण, क्षेपणास्त्र क्षमता, प्रादेशिक सुरक्षेचे समीकरण – या सर्वांवरील तज्ज्ञांची मते सातत्याने समोर येत आहेत. मात्र या सर्व चर्चांमध्ये जग एक कळीचा मुद्दा मात्र पद्धतशीरपणे विसरले आहे, जर इराणकडे अणुक्षमता असेल, तर ती त्याला मिळाली कशी? आधुनिक अणुक्षमता ही एकाकीपणे निर्माण होत नाही. त्यासाठी उच्च दर्जाचे वैज्ञानिक ज्ञान, संवेदनशील तंत्रज्ञानाची उपलब्धता आणि औपचारिक किंवा अनौपचारिक आंतरराष्ट्रीय नेटवर्कची आवश्यकता असते. इराणचा अणुप्रवास हा एका देशाच्या मर्यादित प्रयत्नांचा परिणाम नसून अनेक दशकांतील जागतिक परस्परसंवादातून घडलेली प्रक्रिया आहे. मग जग परिणामांवर चर्चा करत आहे, पण कारणांकडे दुर्लक्ष का करत आहे ? या बाबतचा इतिहास पाहणे गरजेचे आहे. १९६७ मध्ये इराणला अमेरिकेकडून पहिला संशोधन रिॲक्टर मिळाला. १९७९च्या इराणमधील क्रांतीने मित्रत्वाची समीकरणे बदलली आणि २०१५च्या ऐतिहासिक अणुकरारामधून इराणच्या अणुकार्यक्रमावर मर्यादा आणण्याचा प्रयत्न झाला. या सर्व घटनाक्रमाकडे पाहिल्यास लक्षात येते की, इराणचा अणुप्रवास हा वस्तुतः अमेरिकेनेच सुरू केला होता. आज हा केवळ तंत्रज्ञानाचा विषय नसून तो बदलत्या जागतिक युतींचा आणि तुटलेल्या करारांचा इतिहास आहे. जेव्हा इराण अणुक्षमता विकसित करत होता, तेव्हा ही विकसित राष्ट्रे काय करत होती? इराणचा अणुकार्यक्रम लपूनछपून चालणारा नव्हता. नागरी अणुऊर्जा प्रकल्प, संशोधन केंद्रे, तांत्रिक सहकार्य या सर्व घडामोडी दशकानुदशके जगासमोरच होत होत्या. त्या काळात आंतरराष्ट्रीय संस्था, करार व्यवस्था आणि प्रमुख शक्ती यांना याची पूर्ण कल्पना होती. तरीही, त्यावेळी ना तीव्र विरोध झाला, ना निर्णायक हस्तक्षेप. मग आजच हा प्रश्न इतक्या तीव्रतेने का उभा राहतो? यातील सर्वांत मोठा विरोधाभास म्हणजे इराणच्या अणुकार्यक्रमाची पायाभरणीच पाश्चिमात्य मदतीतून झाली होती. 'ॲटम्स फॉर पीस' या उपक्रमांतर्गत अमेरिकेचेच माजी अध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या नेतृत्वाखाली इराणला अणुसंशोधनासाठी मदत देण्यात आली. पुढे विविध युरोपीय आणि इतर देशांनी नागरी अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये गुंतवणूक केली, तांत्रिक मदत दिली आणि पायाभूत सुविधा उभारण्यात सहभाग घेतला. म्हणजेच, आज ज्या क्षमतेकडे संशयाने पाहिले जाते, त्याच क्षमतेची बीजे जागतिक शक्तींनीच पेरली होती. इराणच्या अणुकार्यक्रमाचा गुंता समजून घेण्यासाठी 'अणुइंधन चक्र' प्रक्रिया समजून घेणे आवश्यक आहे. मुळात, खाणीतून काढलेल्या नैसर्गिक युरेनियमवर प्रक्रिया करून त्याचे 'समृद्धीकरण' केले जाते. जेव्हा हे समृद्धीकरण ३ टक्के ते ५ टक्क्यांपर्यंत असते, तेव्हा त्याचा वापर वीज निर्मितीसाठी होतो. मात्र, जेव्हा हेच प्रमाण ९० टक्क्यांपेक्षा जास्त वाढवले जाते, तेव्हा त्यातून अण्वस्त्रे बनवणे शक्य होते. तंत्रज्ञानाच्या या प्रवासात वीज निर्मिती आणि अण्वस्त्रे निर्मिती यांच्यातील सीमारेषा अतिशय पुसट असते. अणुप्रसारावर चर्चा करताना पाकिस्तानचे वैज्ञानिक ए. क्यू. खान यांच्या नेटवर्कचा उल्लेख टाळता येत नाही. खान नेटवर्कने इराणसह अनेक देशांना अणुतंत्रज्ञान पुरवल्याचे आंतरराष्ट्रीय चौकशीत उघड झाले आहे. सेंट्रीफ्युज डिझाइन्स आणि तांत्रिक ज्ञान गुप्त मार्गाने हस्तांतरित करण्यात आले, मग त्यावेळी अमेरिका गप्प का बसली?

अमेरिकेने इराणवरील निर्बंध कडक केल्यानंतर, रशियाने बुशहर अणुऊर्जा प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यात तांत्रिक सहकार्य दिले, तर चीनने युरेनियम उत्खनन आणि प्रक्रिया क्षेत्रात इराणला महत्त्वपूर्ण मदत केली. हे सहकार्य केवळ आर्थिक नसून जागतिक राजकारणात अमेरिकेच्या वर्चस्वाला शह देण्याचे एक धोरणात्मक पाऊल होते, ज्यामुळे इराणची अणुक्षमता अधिक विस्तारत गेली. अणुइंधनाचे तंत्रज्ञान आणि युरेनियम प्रक्रियेसाठी चीनने सुरुवातीच्या काळात मदत केली. ७० च्या दशकात इराणच्या 'युरोडिफ' या युरेनियम समृद्धीकरण प्रकल्पात फ्रान्सचीदेखील मोठी भागीदारी होती, सुरुवातीला बुशहर प्रकल्पाचे काम जर्मनीच्या सीमेन्स कंपनीने सुरू केले होते. एकूण काय, तर अमेरिका, युरोपियन देश अणि चीन-रशिया द्वयीने इराणला इथपर्यंत आणून ठेवले आहे. त्या काळात इराण हा पाश्चिमात्यांचा धोरणात्मक सहयोगी देश होता. पण आज परिस्थिती पूर्णपणे पालटली आहे – काल ज्याला मित्र म्हणून खांद्यावर घेतले तो मित्र आजचा धोका बनला आहे. या संपूर्ण प्रक्रियेत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे आंतरराष्ट्रीय करार आणि देखरेख व्यवस्था. इराण हा या कराराचा भाग आहे. या कराराचा उद्देश अण्वस्त्र प्रसार रोखणे, शांततापूर्ण अणुऊर्जेचा वापर प्रोत्साहित करणे हा आहे. या कराराची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याची जबाबदारी आयएईए या संस्थेवर आहे. ही आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था विविध देशांच्या अणुकार्यक्रमांची तपासणी करते, नियमांचे पालन होत आहे का हे पाहते आणि अणुसाहित्याचा गैरवापर रोखण्याचा प्रयत्न करते; परंतु इराणच्या बाबतीत आयएईएची भूमिका संशयास्पद राहिली आहे.

**– राजीव शाह**

# मानवतेची अखंड ज्योत : जागतिक रेड क्रॉस दिन

मानवजातीच्या इतिहासात युद्धे, नैसर्गिक आपत्ती, रोगराई, दुष्काळ आणि विविध संकटांनी नेहमीच माणसाच्या अस्तित्वासमोर मोठे प्रश्न उभे केले आहेत. अशा संकटांच्या काळात मानवतेच्या रक्षणासाठी काही संस्था आणि व्यक्ती देवदूतासारख्या धावून येतात. जगभरात दुःख, वेदना आणि संकटात सापडलेल्या लोकांना आधार देणाऱ्या अशाच महान चळवळीचे नाव म्हणजे रेड क्रॉस होय. दरवर्षी ८ मे हा दिवस 'जागतिक रेड क्रॉस दिन' म्हणून साजरा केला जातो. हा दिवस मानवतेची सेवा, सहानुभूती, करुणा आणि निःस्वार्थ वृत्ती यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे. रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक हेन्री ड्युनाँ यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस जगभर साजरा केला जातो. त्यामुळे या दिवसाला ऐतिहासिक, सामाजिक आणि मानवी दृष्टिकोनातून विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

मानवतेच्या सेवेसाठी समर्पित असलेल्या रेड क्रॉस चळवळीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. १८५९ साली इटलीतील सोल्फेरिनो येथे फ्रान्स आणि ऑस्ट्रिया यांच्यात भीषण युद्ध झाले. या युद्धात हजारो सैनिक जखमी झाले होते. युद्धभूमीवर जखमी सैनिक वेदनेने तडफडत होते, परंतु त्यांच्यासाठी पुरेशी वैद्यकीय मदत उपलब्ध नव्हती. त्या वेळी स्वित्झर्लंडचे व्यापारी आणि समाजसेवक हेन्री ड्युनाँ तेथे उपस्थित होते. त्यांनी ही भीषण परिस्थिती पाहिली आणि त्यांचे मन व्यथित झाले. त्यांनी स्थानिक लोकांना एकत्र करून जखमी सैनिकांना मदत करण्यास सुरुवात केली. 'टुट्टी फ्रेटेली' म्हणजे 'आपण सर्व भाऊ आहोत' हा संदेश देत त्यांनी मानवतेची एक नवीन दिशा जगासमोर ठेवली.

या अनुभवातून प्रेरित होऊन हेन्री ड्युनाँ यांनी 'अ मेमरी ऑफ सोल्फेरिनो' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकामध्ये त्यांनी युद्धातील अमानुष परिस्थितीचे वर्णन केले आणि युद्धग्रस्तांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंसेवी मदतसंस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. त्यांच्या या विचारांना जगभरातून प्रतिसाद मिळाला आणि १८६३ साली आंतरराष्ट्रीय रेड क्रॉस समितीची स्थापना झाली. पुढे १८६४ मध्ये जिनिव्हा करार झाला आणि युद्धातील जखमी सैनिकांच्या संरक्षणासाठी काही आंतरराष्ट्रीय नियम निश्चित करण्यात आले. याच क्षणापासून रेड क्रॉस चळवळीचा जागतिक प्रवास सुरू झाला.

रेड क्रॉस चळवळीची सात मूलभूत तत्त्वे ही तिच्या कार्याची खरी ओळख आहेत. मानवता, निष्पक्षता, तटस्थता, स्वातंत्र्य, स्वयंसेवा, एकता आणि सार्वत्रिकता ही तत्त्वे केवळ शब्द नसून मानवतेच्या सेवेसाठी जगणाऱ्या प्रत्येक स्वयंसेवकाच्या कार्याचे अधिष्ठान आहेत. मानवता हे तत्त्व सर्वांत महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत माणसाचे दुःख कमी करणे आणि त्याचे जीवन सुरक्षित ठेवणे हे रेड क्रॉसचे प्रमुख उद्दिष्ट आहे. निष्पक्षता म्हणजे जात, धर्म, भाषा, वर्ण किंवा राजकीय विचार न पाहता सर्वांना समान मदत करणे. तटस्थतेमुळे रेड क्रॉस कोणत्याही राजकीय किंवा लष्करी संघर्षात पक्षपाती भूमिका घेत नाही. त्यामुळेच जगभरातील लोकांचा या संस्थेवर विश्वास टिकून आहे. रेड क्रॉसचे कार्य केवळ युद्धापुरते मर्यादित नाही. नैसर्गिक आपत्तींच्या काळातही ही संस्था मोठ्या प्रमाणावर मदतकार्य करते. भूकंप, पूर, चक्रीवादळ, त्सुनामी, दुष्काळ यांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसचे स्वयंसेवक तातडीने घटनास्थळी पोहोचतात. तेथे अन्न, पाणी, औषधे, निवारा आणि मानसिक आधार उपलब्ध करून देतात. अनेक वेळा अशा परिस्थितीत सरकारी यंत्रणाही अपुऱ्या पडतात, परंतु रेड क्रॉसचे स्वयंसेवक जीवाची पर्वा न करता मदतकार्य सुरू ठेवतात. त्यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचतात आणि त्यांना नवजीवन मिळते. आरोग्य क्षेत्रामध्ये रेड क्रॉसचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. रक्तदान चळवळीमध्ये या संस्थेची भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. जगभरात रक्तदान शिबिरे आयोजित करून लाखो रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य रेड क्रॉस करत आहे. आजही अपघात, शस्त्रक्रिया किंवा विविध आजारांमुळे अनेक रुग्णांना रक्ताची गरज भासते. अशा वेळी रक्तदान हे सर्वांत मोठे दान मानले जाते. रेड क्रॉसने समाजात रक्तदानाविषयी जागृती निर्माण केली आहे. 'रक्तदान हेच जीवनदान' हा संदेश या संस्थेने प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवला आहे.

कोविड-१९ महामारीच्या काळात रेड क्रॉसने दिलेली सेवा संपूर्ण जगाने अनुभवली. त्या कठीण काळात लाखो लोकांना अन्न, औषधे, ऑक्सिजन आणि वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात रेड क्रॉसने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण असताना रेड क्रॉसचे स्वयंसेवक धैर्याने काम करत होते. अनेकांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून इतरांचे प्राण वाचवले. महामारीच्या काळात मानवतेचे खरे दर्शन घडवणाऱ्या संस्थांमध्ये रेड क्रॉसचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

भारतात रेड क्रॉस चळवळीची स्थापना १९२० साली झाली. भारतीय रेड क्रॉस सोसायटीने देशभरात विविध सामाजिक, आरोग्यविषयक आणि आपत्ती व्यवस्थापनाचे उपक्रम राबवले आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागांमध्ये आरोग्य सेवा पोहोचवणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देणे आणि आपत्तीग्रस्तांना मदत करणे ही या संस्थेची प्रमुख कामे आहेत. भारतामध्ये पूर, भूकंप, दुष्काळ आणि चक्रीवादळांसारख्या संकटांच्या वेळी रेड क्रॉसने दिलेली मदत लोकांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

महाराष्ट्रातही रेड क्रॉसचे कार्य मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. पूरग्रस्त भागांमध्ये मदतकार्य, आरोग्य शिबिरे, रक्तदान मोहिमा आणि विद्यार्थ्यांसाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करून ही संस्था समाजात सकारात्मक परिवर्तन घडवून आणत आहे. ग्रामीण भागात प्राथमिक उपचारांचे प्रशिक्षण देऊन अनेकांचे जीव वाचवण्यास मदत होत आहे. आजच्या काळात आपत्ती व्यवस्थापनासाठी प्रशिक्षित स्वयंसेवकांची गरज वाढत आहे आणि रेड क्रॉस या क्षेत्रात प्रभावीपणे कार्यरत आहे.



रेड क्रॉसच्या कार्यामध्ये युवकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. महाविद्यालये आणि शाळांमध्ये युवक रेड क्रॉसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सेवा, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीची भावना विकसित केली जाते. युवकांनी समाजासाठी काम करावे, रक्तदान करावे, पर्यावरण संवर्धनात सहभागी व्हावे आणि संकटाच्या काळात लोकांना मदत करावी, हा संदेश युवक रेड क्रॉसद्वारे दिला जातो. आजच्या तरुण पिढीमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी ही चळवळ अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

जागतिक रेड क्रॉस दिन साजरा करण्यामागे केवळ संस्थेच्या कार्याचा गौरव करणे हा उद्देश नाही, तर समाजामध्ये मानवतेची भावना रुजवणे हा त्यामागील मुख्य हेतू आहे. आजच्या युगात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्रचंड प्रगती केली असली तरी मानवी संवेदनशीलता अनेक ठिकाणी कमी होताना दिसते. स्वार्थ, स्पर्धा आणि भौतिकवादाच्या या काळात माणूस माणसापासून दूर जात आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्था मानवतेचे महत्त्व अधोरेखित करतात. मानवतेच्या सेवेसाठी आर्थिक संपत्तीपेक्षा संवेदनशील मनाची अधिक गरज असते. एखाद्या संकटग्रस्त व्यक्तीला आधार देणे, भुकेल्याला अन्न देणे, रक्तदान करणे किंवा आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे या छोट्या कृतीदेखील समाजात मोठा बदल घडवू शकतात. रेड क्रॉस आपल्याला हेच शिकवते की, मानवतेपेक्षा मोठा धर्म कोणताही नाही. आज जगभरात युद्ध, दहशतवाद, हवामान बदल आणि महामारी यांसारखी अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. लाखो लोक विस्थापित होत आहेत, अनेकांचे जीवन उद्ध्वस्त होत आहे. अशा परिस्थितीत रेड क्रॉससारख्या संस्थांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. मानवतेच्या सेवेसाठी कार्य करणाऱ्या या संस्था जगात आशेचा किरण निर्माण करतात. तंत्रज्ञानाच्या मदतीने रेड क्रॉसने आपले कार्य अधिक प्रभावी केले आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी आधुनिक साधने, माहिती तंत्रज्ञान आणि संप्रेषण माध्यमांचा वापर करून मदतकार्य अधिक वेगाने केले जात आहे.

रेड क्रॉसचे स्वयंसेवक हे या चळवळीचे खरे शिल्पकार आहेत. कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजासाठी काम करणारे हे स्वयंसेवक मानवतेची जिवंत उदाहरणे आहेत. अनेक वेळा स्वतःच्या कुटुंबाची चिंता बाजूला ठेवून ते संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जातात. त्यांच्या सेवेमुळेच लाखो लोकांना नवजीवन मिळते. त्यांच्या कार्यामुळे समाजामध्ये सहकार्य, बंधुभाव आणि एकतेची भावना निर्माण होते.

जागतिक रेड क्रॉस दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. समाजात असलेल्या दुःख आणि वेदना कमी करण्यासाठी प्रत्येकाने काही ना काही योगदान दिले पाहिजे. रक्तदान, अवयवदान, स्वयंसेवा, पर्यावरण संवर्धन किंवा शिक्षणाच्या माध्यमातून समाजासाठी कार्य करता येऊ शकते. माणसाने केवळ स्वतःपुरता विचार न करता समाजाच्या कल्याणासाठी पुढे आले पाहिजे. कारण समाजातील प्रत्येक व्यक्ती सुरक्षित आणि सुखी असेल, तरच खऱ्या अर्थाने मानवतेचा विजय होईल.

आज अनेक तरुण सामाजिक कार्याकडे वळताना दिसत आहेत, ही सकारात्मक बाब आहे. समाजमाध्यमांच्या माध्यमातून जनजागृती, निधी संकलन आणि मदतकार्य अधिक प्रभावीपणे केले जात आहे. परंतु केवळ ऑनलाईन सहानुभूती पुरेशी नसून प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची आहे. रेड क्रॉसची शिकवण आपल्याला कृतीशील मानवता शिकवते. संकटाच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे हीच खरी देशसेवा आणि मानवसेवा आहे.

शेवटी असे म्हणता येईल की, जागतिक रेड क्रॉस दिन हा मानवतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा अत्यंत महत्त्वाचा दिवस आहे. हेन्री ड्युनाँ यांनी सुरू केलेली ही चळवळ आज जगभरातील लाखो लोकांसाठी आशेचा आधार बनली आहे. सेवा, सहानुभूती, बंधुभाव आणि निःस्वार्थ वृत्ती या मूल्यांवर उभी असलेली रेड क्रॉस चळवळ मानवतेचा खरा चेहरा जगासमोर मांडते. आजच्या काळात प्रत्येकाने या चळवळीपासून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात मानवतेची भावना जोपासली पाहिजे. कारण शेवटी माणसाला माणसाचीच गरज असते, आणि संकटाच्या काळात पुढे येणारा मदतीचा हातच खऱ्या अर्थाने मानवतेचा लाल ध्वज ठरतो.

**- डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

## उत्तर सडेतोड

आतंकवादास उत्तर
समस्त अतीवआतुर
काहीकसे होत नाही
अस्वस्थ होते फितूर

तोंडा लावती कुलूप
वाचाळ थातुर मातुर
का लागतो विलंब रे
मना नाचते शंकासूर

एलओसी पाशीचाले
रे पाकड्याची कुरबूर
प्रश्न नाचे जिथे तिथे
कितीदाखवाल सबूर

सर्वप्रश्ना निरुत्तर करे
होई ऑपरेशन सिंदूर
बल शाली भारताचा
डंका वाजला सर्वंदूर

पहलगामी हल्ल्याचे
संतुष्टसमस्त बेकसूर
ईट का जबाब पत्थर
पाकडे मनसुबे भेसूर

पहायचा आहे अजून
तुजभारतीय चढासूर
जखमातुझ्या सळाळे
भगेंद्रातहोणार नासूर

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# निवडणुकीत होणारी हिंसा अयोग्य !



निवडणुका आणि हिंसा हे आपल्या लोकशाहीला नवे नाही. निवडणुकीत हिंसाचार होतोच मग ती ग्रामपंचायतीची निवडणूक असो की विधानसभा, लोकसभेची. हिंसाचार झाल्याशिवाय निवडणुका पार पडत नाहीच असा आपला अनुभव आहे.

विशेषतः उत्तर भारतीय हिंदी भाषिक पट्ट्यातील राज्यात तर निवडणुका आणि हिंसाचार हे एकाच नाण्याच्या दोन बाजू ठरल्या आहेत. त्यामानाने महाराष्ट्रात खूप चांगली परिस्थिती आहे. आपल्या राज्यातील निवडणुकीत हिंसाचाराचे प्रमाण तुरळक असते. पण इतर राज्यात मात्र निवडणुकीआधी किंवा निवडणुकीनंतर मोठ्या प्रमाणावर हिंसाचार होतो. आता पश्चिम बंगालचेच पहा ना या राज्यात विधानसभा निवडणुकीचा निकाल घोषित होताच मोठा हिंसाचार उसळला. निवडणुकीचा निकाल घोषित होताच राजकीय पक्षातील कार्यकर्त्यात हाणामारी, मारामारीच्या घटना घडल्या. इतकेच नाही तर तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनाही घडल्या.

या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांची हत्या झाली तर शेकडो कार्यकर्ते जखमी झाले. भाजपचे मुख्यमंत्रीपदाचे दावेदार व वरिष्ठ नेते सुवेंदु अधिकारी यांचे पी ए चंद्रनाथ रथ यांचीही गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. पोलिसांनी हिंसाचार प्रकरणी ४०० कार्यकर्त्यांना अटक केली असून तेथील परिस्थिती तणावपूर्ण आहे. हा हिंसाचार थांबण्यासाठी पोलिस दल सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे पण परिस्थिती नियंत्रणाबाहेर चालली आहे. अर्थात पश्चिम बंगालला निवडणुकीतील हिंसाचार नवा नाही. मागील विधानसभा निवडणुकीच्या आधीही तिथे असाच हिंसाचार उसळला होता. तेंव्हा झालेल्या हिंसाचारात तर ३५ जणांची हत्या झाली होती इतकेच नाही तर त्यावेळी हिंसाचारात बॉम्बचस्फोट देखील करण्यात आला होता. आताही जवळपास तशीच परिस्थिती बंगालमध्ये आहे. हा हिंसाचार भाजपचे नेते आणि कार्यकर्ते घडवून आणत आहेत असा आरोप तृणमूल काँग्रेसने केला आहे तर ममता बॅनर्जींच्या इशाऱ्यावर तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते पश्चिम बंगालमध्ये हिंसा घडवून आणत आहेत असा आरोप भाजपतर्फे केला जात आहे.

हे दोन्ही पक्ष हिंसाचार प्रतिस्पर्धी पक्षाने घडवून आणला असा आरोप करत असले तरी हिंसाचारात दोन्ही बाजूचे कार्यकर्ते सहभागी असल्याने या हिंसाचारास भाजप आणि तृणमूल हे दोन्ही पक्ष तितकेच जबाबदार आहेत असा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. पश्चिम बंगालमध्ये उसळलेल्या या राजकीय हिंसाचाराचे समर्थन कोणी करणार नाही. हिंसा ही निषेधार्हच असते. लोकशाहीत हिंसेला थारा नाही. पश्चिम बंगालमधील या हिंसाचारात ४ कार्यकर्त्यांचा बळी गेला ही चिंताजनक बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी तर ही भयावह अशीच बाब आहे. भारतीय लोकशाहीसाठी हे शुभचिन्ह नाही वास्तविक लोकशाहीत हिंसेला स्थान नाही.

पण सध्या जे घडत आहे त्याने लोकशाहीचे धिंडवडे निघत आहे. निवडणुकीत होणारी हिंसा कमी करण्यासाठी निवडणूक आयोगाने ठोस धोरण आखायला हवे. हिंसाचारास जबाबदार असणाऱ्या राजकीय नेत्यांवर व पक्षांवर बंदी आणून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करायला हवी. निवडणूक आयोगाने हिंसामुक्त निवडणुकीसाठी कठोर पावले उचलायला हवीत.

**– श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# उपमहापौर देशमुख यांच्या नवीन दालनाचे लोकार्पण



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०८, परभणी :** परभणी महानगरपालिकेचे उपमहापौर गणेश देशमुख यांच्या नवीन दालनाचे नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात लोकार्पण करण्यात आले. शहरातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमास महापौर सय्यद इकबाल महानगरपालिका आयुक्त नितीन नार्वेकर सभागृह नेते सय्यद समी माजी उपमहापौर भगवान वाघमारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच सामाजिक कार्यकर्ते सय्यद कादर, अमित पाचलिंग, सुनील देशमुख, व्यंकट डहाळे, अलिमोद्दीन काझी, नदीम इनामदार, दिलीप ठाकूर, शुभम पाष्टे, अमोल जाधव, शेख हुसेना बानो शेख हबीब, बागवान मोहम्मद युसूफ मोहम्मद इब्राहीम, शरफोद्दीन सिद्दीकी, अतूल सरोदे, गुलमीर खान, जाकीर बेगम मोहम्मद नईमोद्दीन, विकास राजापूरे, सागर गंगाळे, सफीया बेगम, शाम खोबे आदींची प्रमुख उपस्थिती होती. नवीन दालनाच्या लोकार्पणानंतर उपस्थित मान्यवरांनी उपमहापौर गणेश देशमुख यांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी हे दालन अधिक प्रभावी संवादाचे केंद्र ठरेल व जनसामान्यांच्या कामांना गती मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमात उपस्थित नागरिकांनीही उपमहापौर गणेश देशमुख यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# टाकळी ढोकेश्वर येथे १५ मे रोजी रस्ता रोको आंदोलन

## रविंद्र राजदेव यांचे जिल्हा प्रशासनाला मागण्यांचे निवेदन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७, पारनेर (अहिल्यानगर) :** कांदा उत्पादक शेतकर्यांच्या विविध समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगर-कल्याण महामार्गावर टाकळी ढोकेश्वर येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाची पूर्वकल्पना देणारे निवेदन पक्षाचे नेते रवींद्र राजदेव आणि गटाच्या नेत्या सोनिया राजदेव यांच्या नेतृत्वाखाली अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गीते यांना सुपूर्द करण्यात आले. निवेदन सादर केल्यानंतर दोन्ही नेत्यांनी प्रशासनाशी चर्चा करून शेतकर्यांच्या बिकट परिस्थितीकडे लक्ष वेधले.

गेल्या काही महिन्यांत कांदा उत्पादक शेतकर्यांना प्रचंड आर्थिक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. महाराष्ट्रातील नाशिक, अहमदनगर, पुणे, सातारा आणि सोलापूर या प्रमुख जिल्ह्यांमध्ये कांदा हे मुख्य नगदी पीक मानले जाते.

यंदाच्या हंगामात चांगल्या पावसामुळे उत्पादन वाढले असले, तरी बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्यातील तफावतीमुळे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळले आहेत.

सद्य:स्थितीत शेतकर्यांना प्रति क्विंटल केवळ ८०० ते १५०० रुपये भाव मिळत आहे, जो बी-बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि वाहतूक या एकूण उत्पादन खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. यामुळे शेतकर्यांची आर्थिक स्थिती खालावली असून, त्यांना मोठा तोटा सहन करावा लागत आहे.



जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही, तोपर्यंत १५ मे रोजीचा रस्ता रोको शांततापूर्ण मार्गाने होणार असल्याचे रविंद्र राजदेव यांनी स्पष्ट केले. आंदोलनामुळे अहिल्यानगर - कल्याण महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत होण्याची शक्यता आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा वाढत्या संकटामुळे आणि आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने तातडीने समन्वयाने पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे, अन्यथा भविष्यात हे आंदोलन अधिक तीव्र होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

रवींद्र राजदेव यांनी अपर जिल्हा दंडाधिकारी गीते यांच्यासोबत सुमारे चाळीस मिनिटे सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी शेतकर्यांच्या समस्यांचा पाढा वाचला.

निवेदनात प्रामुख्याने कांद्याला किमान आधारभूत किंमत (एमएसपी) जाहीर करावी, कांदा निर्यातीवरील बंदी तत्काळ उठवून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश मिळावा, जिल्ह्यांतर्गत कोल्ड स्टोरेज सुविधांचा विस्तार करावा, नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज द्यावे, ई- नामसारख्या प्लॅटफॉर्मचा वापर करून थेट बाजारापेठ उपलब्ध करून द्यावी आणि कांदा प्रक्रिया उद्योगाला प्रोत्साहन द्यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.

यावर अपर जिल्हा दंडाधिकारी गिते यांनी शेतकऱ्यांच्या मागण्या आणि समस्या त्वरित राज्य शासनाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. शासन स्तरावर यावर योग्य तो विचार करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# तक्रार निवारण दिनानिमित्त नागरिकांना आवाहन




**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०८, अहिल्यानगर :** नागरिकांच्या तक्रारी तत्परतेने सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने शुक्रवार, दिनांक ०८ मे २०२६ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत संपूर्ण जिल्ह्याततक्रार निवारण दिनआयोजित करण्यात येणार आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय, अहिल्यानगर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत असून, या दिवशी सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी संबंधित पोलीस ठाण्यांमध्ये उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेणार आहेत. प्रलंबित प्रकरणे, स्थानिक समस्या तसेच कायदा व सुव्यवस्था संदर्भातील मुद्द्यांवर तत्काळ कार्यवाही करण्यावर भर दिला जाणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये हा उपक्रम एकाच वेळी पार पडणार असून, प्रत्येक ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक तसेच इतर वरिष्ठ अधिकारी हजर राहणार आहेत.यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी, अडचणी किंवा सूचना थेट पोलीस अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, तक्रार निवारण दिनाचा लाभ घेऊन स्थानिक पातळीवरील प्रश्न मार्गी लावण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असेही पोलीस प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिक आणि पोलीस यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होण्यासाठी आणि जनतेचा विश्वास वृद्धिंगत करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# शिळफाटा उड्डाणपुलाखालील अतिक्रमणाची तक्रार जिल्हाधिकारी दप्तरी दाखल

## तक्रारीनंतर कारवाई होते का? याकडे नागरिकांचे लक्ष

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०७, शिळफाटा (ठाणे) :** शिळफाटा आणि भारत गिअर्स उड्डाणपुलाखाली सुरू असलेल्या अनधिकृत पार्किंग व लोखंडी केबिनच्या अतिक्रमणाविरोधात समाजसेवक विनोद शनिवार वास्कर यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे व्हॉट्सअॅपद्वारे तक्रार दाखल केली होती.



या तक्रारीची प्रशासनाने तातडीने दखल घेतली असून तक्रार क्रमांक २६०३२२५ नोंदवण्यात आला आहे. आपली निवेदन/तक्रार संबंधित विभागाकडे उचित कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

सदर तक्रारीवरील कार्यवाहीबाबत अहवाल प्राप्त होताच आपणांस अवगत करण्यात येईल, असे लेखी कळवण्यात आले आहे.

उड्डाणपुलाखाली NHAI च्या नियमानुसार कोणतेही अतिक्रमण किंवा पार्किंगला परवानगी नाही. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने हा गंभीर प्रश्न आहे. तक्रार केल्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय खरंच दखल घेते का? प्रत्यक्षात कारवाई होते का?याकडे आता शिळ-डायघर परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

प्रशासनाने तक्रार क्रमांक देऊन सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आता संबंधित विभाग उड्डाणपुलाखालील अनधिकृत पार्किंग व केबिनबाबत काय भूमिका घेते, हे पाहणे महत्त्वाचे आहे, अशी प्रतिक्रिया विनोद वास्कर यांनी दिली.

# नालेसफाई व विविध नागरी सुविधांची नमुंमपा आयुक्तांकडून पाहणी



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०७, नवी मुंबई :** महानगरपालिका क्षेत्रातील नालेसफाईची कामे गतीने सुरु असून महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी विविध नागरी सुविधा कामे व प्रकल्पांची पाहणी करताना कोपरी व सेक्टर १७ वाशी येथील नालेसफाई कामांची पाहणी करीत काढलेला गाळ काहीसा सुकल्यानंतर लगेच उचलून नेण्याचे निर्देश दिले. महानगरपालिकेच्या वतीने नैसर्गिक नालेसफाई करताना प्रामुख्याने वाहत्या प्रवाहामधील अडथळे दूर करण्यास प्राधान्य देण्यात येते. यावर्षी नाल्यांमधील गाळ काढण्याचे काम मोठया प्रमाणात करण्यात येत असून त्यामुळे पावसाळी कालावधीत अडचण होणार नाही असा विश्वास आयुक्तांनी व्यक्त केला.या पाहणी दौऱ्यांमध्ये आयुक्तांसमवेत अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, परिमंडळ १ चे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, परिमंडळ २ चे उपआयुक्त संजय शिंदे, उद्यान उपआयुक्त स्मिता काळे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे तसेच संबंधित विभाग अधिकारी, कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.सकाळी ८ वाजता घणसोली – ऐरोली खाडीवरील पामबीच संलग्न ब्रीजच्या कामापासून पाहणी दौऱ्यास सुरुवात करताना त्या ठिकाणी बनवायच्या ८९ पिअर्सपैकी ४४ पिअर्सचे काम पूर्ण झाले असून उर्वरित पिअर्सचे फाऊन्डेशनपर्यंत आलेले काम जून अखेरीस पिअर कॅपपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. त्याचप्रमाणे पावसाळी कालावधीत स्पाईन, विंग व गर्डर कास्टींगचे काम पूर्ण करावे अशाही सूचना देण्यात आल्या. गर्डर लाँचिंगचे काम सुरु झाले की मध्ये थांबवू नये असे स्पष्ट निर्देश देत करायच्या कामाचे दिनांक निहाय नियोजन करा आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करा असेही निर्देश आयुक्तांनी दिले.तळवली नाका येथे प्रवेशद्वाराजवळ चौकात होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या ठिकाणाला भेट देत नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी आयआयटी तज्ञांची मदत घेऊन आराखडा तयार करावा व त्याची लवकरात लवकर अंमलबजावणी करावी तसेच रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी केल्याने वाहतूक कोंडीत अधिक भर पडते हे लक्षात घेत त्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करावी असेही निर्देश देण्यात आले.कोपरी स्मशान भूमीमध्ये अंत्यसंस्कारासाठी येणाऱ्या मृत व्यक्तींच्या कुटुंबियांसाठी स्नानगृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याचे तसेच अस्थी ठेवण्यासाठी लॉकरची व्यवस्था करण्याचे ही आयुक्तांनी सूचित केले. नाल्यामधून स्वच्छ पाणी वाहते राहील याकडे विशेष लक्ष देण्याच्या दृष्टीने एमआयडीसी, एमपीसीबी व महानगरपालिका अशा तिन्ही प्राधिकरणांच्या अभियंत्यांनी नाल्याचा उगम होतो तिथून खाडीपर्यंत पाहणी करुन ज्या ठिकाणी नाले दूषित होतात अशा जागी छोटे मलप्रक्रिया युनिट उभारुन नाल्यात येणारे पाणी स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी असे निर्देश आयुक्तांनी सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभागाला दिले.

# बंगाली कॅम्प चौकात ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरात अपघाताची मालिका सुरु असून या मालिकेत आज सकाळी ७ मे रोजी बंगाली कॅम्प चौकात भीषण अपघात झाला. ट्रकच्या धडकेत एका महिलेला आपला जीव गमवावा लागला. २ दिवसात शहरातील ३ नागरिक अपघाताला बळी पडल्याने नागरिकांमध्ये चांगला संताप उफाळून आला असून यावर उपाययोजना करावी. अशी मागणी करण्यात आली आहे.

बंगाली कॅम्प परिसरात सकाळच्या सुमारास कामगार वर्गाची मोठी गर्दी असते. सकाळी एक महिला सायकलने कामाला जात असताना त्या महिलेला ट्रक ने धडक दिली. महिला खाली पडली, तितक्यात ट्रकचे चाक महिलेच्या डोक्यावरुन गेल्याने महिलेचा जागीच मृत्यू झाला. या चौकात भीषण अपघात होणार यावर उपाययोजना करण्यात यावी यासंबंधी भाजप महामंत्री मनोज पॉल यांनी जिल्हाधिकारी पंत यांना निवेदन ही दिले होते. मात्र प्रशासनाने त्या निवेदनाची दखल घेतली नाही.

दोन दिवसापूर्वी चंद्रपूर-नागपूर मार्गावरील डॉमिनोझ पिझ्झा सेंटर समोर ३८ वर्षीय उमाकांत वाघमारे हे कामावरुन आपल्या दुचाकी वाहनाने घरी जात असताना रस्त्याच्या मध्ये उभ्या असलेल्या वाहनाच्या चालकाने दार उघडले, अचानक दार उघडल्याने उमाकांत च्या दुचाकीची कट लागत तो खाली कोसळला. उठण्याच्या प्रयत्नात असलेल्या उमाकांत च्या अंगावरुन टँकर चे चाक गेल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. यावर आम आदमी पक्षाचे जिल्हाध्यक्ष मयूर राईकवार यांनी आवाज उठवत निवेदनाच्या माध्यमातून या मार्गावरील खरी परिस्थिती पुढे आणि वाहतूक पोलीस निरीक्षकाच्या बेजबाबदारपणामुळे या मार्गावर वाहन चालक रस्त्यावर वाहने उभे करतात,



त्यांची बदली करा अशी मागणी राईकवार यांनी पोलीस अधिक्षकाकडे केली.

त्याच दिवशी प्रदीप सिडाम नामक युवकाचा सावरकर चौकात वळण घेत असताना भरधाव वेगात येणाऱ्या वाहनाने प्रदीपच्या दुचाकीला धडक दिली. प्रदीप खाली कोसळला, मात्र तोवर ट्रकचे चाक त्याच्या अंगावरुन गेले आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. दोन घटना घडल्यावर सुध्दा प्रशासन जागे झाले नाही, आणि परत आज ७ मे रोजी प्रशासनाच्या गलथान कारभारामुळे महिलेचा ट्रक अपघातात बळी गेला. बॅंगाली कॅम्प चौकात नेहमीच ट्रकची वर्दळ मोठ्या प्रमाणात असते. चौकात असणाऱ्या बार आणि वाईन शॉपमुळे नागरिक आपली वाहने रस्तायावर ठेवत असल्याने नागरिकांना स्वत: चा मार्ग काढणे कठीण होतो. त्यामुळे याठिकाणी अपघाताची मालिका वाढत आहे. याबाबत निवेदन दिल्यावर सुध्दा प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेत आहे. चंद्रपुरातील राजकीय जनप्रतिनिधी या गंभीर समस्यांकडे जाणिवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. शहरात वाहतूक व्यवस्था कोलमडल्यानेच रस्ता अपघाताची मालिका सतत वाढत आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात विंग ग्रामपंचायत शासकीय अधिकारी यांच्याकडून तपासणी

**अक्षराज : सुहास महांगरे**

**दि.०८, सातारा :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पार्श्वभूमीवर नुकतीच विंग ता.खंडाळा ग्रामपंचायतची तालुकास्तरीय मूल्यमापन समितीकडून सविस्तर पाहणी करण्यात आली. ही समिती पालघर ता.मोखाडा येथून खंडाळा तालुक्यात तालुकास्तरीय मूल्यमापनासाठी आली असता त्यांनी विंग ग्रामपंचायतच्या विकास कामांची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यामध्ये मुख्य ८ घटकांची पाहणी करण्यात आली.

सुशासन युक्त पंचायतराज, सक्षम पंचायत (स्वनिधी व लोक वर्गणी), जल समृद्ध, स्वच्छता व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, गाव पातळीवरील संस्था व सक्षमीकरण, उपजीविका विकास,




सामाजिक न्याय, लोक सहभाग व श्रमदान माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे, नाविन्यपूर्ण उपक्रम अशा प्रकारच्या सर्व मुख्य घटकांची पाहणी करण्यात आली. या पहाणीत विंग ग्रामपंचायतला १०० पैकी ९८ गुण मिळणार असून विंग ग्रामपंचायतचां खंडाळा तालुक्यात पहिला क्रमांक मिळण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. या समितीत पुढील अधिकाऱ्यांचा समावेश होता. पालघर जिल्ह्यातील अतुलजी पारसकर उपजिल्हा कार्यक्रम अधिकारी मनरेगा तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब चन्नार, तालुका आरोग्य अधिकारी यशवंत पराते, विस्ताराधिकारी पांडुरंग गलंगे, शिक्षण विस्ताराधिकारी अविनाश पाटील, विस्ताराधिकारी सांख्यिकी नितीन आहेर, शिक्षक, घनश्याम हमरे, त्याचप्रमाणे खंडाळा तालुक्यातील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, विस्ताराधिकारी सनिल बोडरे, प्रशासकीय अधिकारी सरपंच स्वप्निल तळेकर, उपसरपंच पूनम तळेकर व सदस्य, ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण पडळकर, ग्रामविकास अधिकारी राहुल शितोळे सर्व शासकीय अधिकारी ग्रामस्थ आणि कर्मचारी उपस्थित होते.

# बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात अत्याधुनिक आरोग्य सुविधांचे जाळे उभारणार : आ.मुनगंटीवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री तथा आ. सुधीर मुनगंटीवार यांनी बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात अत्याधुनिक आरोग्य सुविधांचे जाळे निर्माण करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. 'आरोग्य हा प्रत्येकाचा मूलभूत अधिकार आहे. प्रत्येक नागरिकाला वेळेवर, गुणवत्तापूर्ण आणि सन्मानाने आरोग्य सेवा मिळाली पाहिजे,' हा आपला संकल्प असल्याचेही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

बल्लारपूर येथील ग्रामीण रुग्णालयात आयोजित 'आरोग्य जनसंवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष हरीश शर्मा, महामंत्री मंगेश गुलवाडे, कामगार नेते अजय दुबे, शहर अध्यक्ष रणांजय सिंह, काशी सिंग, निलेश खरबडे, रेणुकाताई दुधे, जिल्हा शल्य चिकित्सक महादेव चिंचोळे, कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, मुख्यधिकारी नगर परिषद मुल विशाल वाघ, महेंद्र ढोके, लखनसिंग चंदेल, वैद्यकीय अधीक्षक गजानन मेश्राम, तालुका आरोग्य अधिकारी आशा साळवे आदिंची उपस्थिती होती.

आरोग्य क्षेत्रातील विविध समस्या, सूचना आणि भविष्यातील नियोजन यावर नागरिक, पदाधिकारी, डॉक्टर व प्रशासन यांच्यासोबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आ. मुनगंटीवार यांनी आरोग्य विषयक सर्व सूचना एकत्र करून त्यावर टप्प्याटप्प्याने निर्णय घेतले जाणार असल्याचे सांगितले. 'आपल्या मतदारसंघात आधुनिक आरोग्य सुविधा




उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. अनेक नवीन दवाखान्यांची कामे सुरू असून संपूर्ण राज्यात आपल्या मतदारसंघाच्या आरोग्य व्यवस्थेची दखल घेतली जात आहे,' असे त्यांनी सांगितले. जन्म आणि मृत्यू आपल्या हातात नाही. पण आयुष्य निरोगी ठेवणे आपल्या हातात आहे. त्यामुळे आरोग्य सेवेला सर्वोच्च प्राधान्य देणे गरजेचे आहे. मी एकटा हे बदल घडवू शकत नाही; यासाठी सर्वांची साथ आवश्यक आहे, असे आवाहनही आ. मुनगंटीवार यांनी केले.

**मुल येथे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या उपजिल्हा रुग्णालयाची उभारणी**

'मुल येथे उभारण्यात येत असलेले ग्रामीण रुग्णालय हे महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या उपजिल्हा रुग्णालयांपैकी एक ठरणार आहे. साधारणतः उपजिल्हा रुग्णालये ८० हजार स्क्वेअर फुटांत उभारली जातात; मात्र मुल येथील रुग्णालय तब्बल १५ हजार स्क्वेअर मीटर म्हणजेच सुमारे १ लाख ५० हजार स्क्वेअर फुट क्षेत्रात विकसित होत आहे. भविष्यात लोकसंख्येच्या वाढीचा विचार करता राज्यातील नवीन रुग्णालये मुलच्या धर्तीवर उभारली गेली पाहिजेत,' अशा सूचना आपण आरोग्य विभागाला दिल्याचे आ. मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

**बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयासाठी विशेष निर्णय**

बल्लारपूर ग्रामीण रुग्णालयाचा संदर्भ देताना आ. मुनगंटीवार म्हणाले, 'शासनाच्या निकषांनुसार पाच एकर जागेची अट होती; मात्र जागेअभावी अडीच एकरमध्ये मल्टी-स्टोरेज पद्धतीने रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. उमरी पोतदार येथे रुग्णालयाची उभारणी करण्यात आली असून कळमना व मानोरा येथेही अत्याधुनिक प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारण्यात आली आहेत.अभिमानाची बाब म्हणजे बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील दुर्गापूर , कळमना, राजोली प्राथमिक आरोग्य केंद्राला एनक्यूएएस केंद्रीय संस्थेद्वारा राष्ट्रीय मानांकन मिळाले आहे.'

**डायलिसिस, सिटीस्कॅन, सोनोग्राफी आणि रक्त तपासणी सुविधांवर भर**

आरोग्य सेवांमध्ये सिटीस्कॅन, सोनोग्राफी, एक्स-रे, डायलिसिस, एअर कंडिशनिंग यांसारख्या सुविधा वाढवण्याचे काम सुरू असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले. डॉक्टरांची वेळेवर उपस्थिती, तज्ज्ञ डॉक्टरांची उपलब्धता आणि स्टाफ वाढवणे यावर विशेष भर देण्यात येत आहे. ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टर सकाळी नऊ वाजता उपस्थित राहिले पाहिजेत. काही स्पेशालिस्ट डॉक्टर उपलब्ध नसतील तर कंत्राटी पद्धतीवर नियुक्त्या करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**अपघात नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना**

बल्लारपूर विधानसभा क्षेत्रात अपघातांमध्ये काही नागरिकांचा मृत्यू झाल्याबद्दल आ. मुनगंटीवार यांनी दुःख व्यक्त केले. नव्याने रुजू झालेल्या पोलीस अधिक्षकांकडे भाजपाच्या शिष्टमंडळाने अपघात नियंत्रणासाठी विशेष उपाययोजना सुचविल्या आहेत. एखाद्या कुटुंबातील व्यक्ती अपघातात गेल्यानंतर त्या कुटुंबावर कोसळणारे दुःख अत्यंत वेदनादायी असते. त्यामुळे या अपघात नियंत्रणाची नितांत गरज असल्याचे ते म्हणाले.

**'आरोग्य माझा अधिकार' अभियान राबविणार**

सरकारच्या विविध आरोग्य योजनांची माहिती अनेकांना नसल्यामुळे गरीब कुटुंब उपचारांपासून वंचित राहतात. त्यामुळे कार्यकर्त्यांनी लोकांपर्यंत योजना पोहोचविणे आवश्यक असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी म्हटले. फुटपाथवरील व्यावसायिकांसाठी पाच लिटर पाण्याच्या कॅनचे वितरण, उन्हाळ्यात उष्माघातापासून संरक्षणासाठी शेड व छत्र्यांचे वितरण यांसारखे उपक्रम राबविले जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

# वरसई-घोटे रस्त्याच्या दुरवस्थेविरोधातील आंदोलन तूर्तास स्थगित...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०७, पेण :** पेण तालुक्यातील वरसई फाटा ते वरसई आणि वरसई ते घोटे या रस्त्यांच्या दुरवस्थेविरोधात आज आयोजित करण्यात आलेला 'सुरक्षित रस्ता हक्क सत्याग्रह' प्रशासनाच्या आश्वासनानंतर तूर्तास स्थगित करण्यात आला. सत्यशोधक सर्वोदया संघटना, महाराष्ट्र यांच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले होते.

वरसई फाटा ते वरसई हा सुमारे ३ किमी तसेच वरसई ते घोटे हा सुमारे ५ किमी रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडल्यामुळे प्रवास धोकादायक बनला असून वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. दुचाकीस्वारांचे अपघात, वाहनांचे नुकसान तसेच शालेय विद्यार्थ्यांचे हाल वाढल्याने नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारला होता.

दरम्यान, आंदोलनस्थळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता एस. एस. मेने यांनी भेट देत आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. वरिष्ठांच्या आदेशानुसार ११ मे रोजी सकाळी ११ वाजता उपविभागीय सार्वजनिक बांधकाम विभाग, पेण येथे बैठक आयोजित करण्यात आल्याचे पत्र त्यांनी आंदोलनकर्त्यांना दिले. तसेच वरसई पूल ते मोहिली इनाम या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम उद्यापासून सुरू करण्यात येईल, असे



आश्वासनही त्यांनी दिले. प्रशासनाच्या आश्वासनानंतर आंदोलन तूर्तास स्थगित करण्यात आले असले तरी रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाले नाही तर यापेक्षाही उग्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्ते संदीप पाटील यांनी दिला. या आंदोलनादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता एस. एस. मेने, बांधकाम विभागाचे अधिकारी समीर पाटील तसेच पेण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप बागुल उपस्थित होते.

# चंद्रपूर शहरातील वाहतूक कोंडी व अपघात रोखण्यासाठी रिंगरोड आणि उड्डाणपूलाची गरज : आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील वाढती वाहतूक कोंडी, अवजड वाहनांचा वाढता ताण आणि सातत्याने घडणारे भीषण अपघात रोखण्यासाठी 'पडोली फाटा ते शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय' दरम्यान स्वतंत्र रिंगरोड बायपास रस्त्याची निर्मिती करण्यात यावी, तसेच वरोरा नाका उड्डाणपूल ते सावरकर चौक ते बंगाली कॅम्प येथील आर.ओ.बी. (एमईएल) रेल्वे लाईनपर्यंत उड्डाणपूल बांधण्यात यावा, अशी मागणी आमदार किशोर जोरगेवार यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली. नागपूर येथे झालेल्या भेटीत आ. जोरगेवार यांनी चंद्रपूर शहरातील वाहतूक समस्यांची सविस्तर माहिती देत तातडीने रिंगरोडसाठी मंजुरी व निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

यावेळी आ. जोरगेवार यांनी सांगितले की, चंद्रपूर हे कोळसा, लोहखनिज, सिमेंट आणि विविध औद्योगिक उपक्रमांमुळे राज्यातील अत्यंत महत्त्वाचे शहर बनले आहे. तसेच नागपूर, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली आणि शेजारील तेलंगणा राज्याला जोडणारे केंद्र असल्याने शहरातून मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक होत



असते. मात्र एनएच-९३० आणि एनएच-९३० डी या राष्ट्रीय महामार्गांना शहराबाहेरून जोडणारा स्वतंत्र पर्यायी मार्ग नसल्याने सर्व वाहतूक शहराच्या मध्यवर्ती भागातूनच होत आहे.

सध्या बल्लारपूर बायपास रोड, बंगाली कॅम्प, रामनगर चौक, वरोरा नाका ते पडोली या मार्गांवर दररोज हजारो अवजड वाहने धावत असल्याने शहरात तीव्र वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. यामुळे शाळकरी विद्यार्थी, रुग्ण, नोकरदार वर्ग आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. प्रस्तावित रिंगरोडमुळे कोळसा, लोखंड व इतर खनिज वाहतूक करणारी अवजड वाहने शहरात प्रवेश न करता थेट बाहेरील मार्गाने जाऊ शकतील. त्यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अपघातांचे प्रमाण घटेल तसेच वायू व ध्वनी प्रदूषणातही मोठी घट होईल, असा विश्वास आ. जोरगेवार यांनी व्यक्त केला. चंद्रपूर शहराच्या भविष्यातील दृष्टीने हा रिंगरोड अत्यंत महत्त्वाचा असून, या प्रकल्पाला तातडीने मंजुरी देण्याची मागणी यावेळी आ. किशोर जोरगेवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

**पडोली चौकात उड्डाणपूल फ उभारण्याची मागणी**

चंद्रपूर शहराच्या विकासासाठी पडोली चौकात उड्डाणपूल उभारण्याची मागणीही आ. किशोर जोरगेवार यांनी यावेळी केली. वाढत्या वाहतुकीमुळे या चौकात सातत्याने कोंडी होत असून भविष्यातील गरजा लक्षात घेता पुलाचे बांधकाम अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच वरोरा नाका उड्डाणपूल ते सावरकर चौक ते बंगाली कॅम्प येथील आर.ओ.बी. (एमईएल) रेल्वे लाईनपर्यंत उड्डाणपूल बांधण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

**८ लेन महामार्ग, ट्रान्सपोर्ट हब व उंच पुलाची मागणी**

नागपूर राज्य महामार्ग (एमएसएच-९) हा सध्या चार पदरी असून औद्योगिक विस्तार आणि वाढत्या मालवाहतुकीचा ताण लक्षात घेता या महामार्गाचे ६ किंवा ८ पदरीकरण करण्यात यावे, अशी मागणी आ. जोरगेवार यांनी केली. याशिवाय केंद्रीय रस्ते निधी (सीआरएफ) अंतर्गत बागला चौक ते बल्लारपूर महामार्ग (एनएच-९३०डी) पर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच वर्धा नदीवरील धानोरा येथे अत्यावश्यक उंच पुलाचे बांधकाम मंजूर करून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. पावसाळ्यात या परिसरातील वाहतूक विस्कळीत होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, चंद्रपूर येथे आधुनिक आणि सर्वसमावेशक ट्रान्सपोर्ट हब उभारण्यात यावा, अशी मागणीही आ. किशोर जोरगेवार यांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली.

## थोडक्यात

# ढोकेश्वर विद्यालयाच्या शिक्षकांकडून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा - सिताराम खिलारी




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०७,पारनेर (अहिल्यानगर) :** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये उपजतच चिकाटी आणि संघर्षातून उभे राहण्याची जिद्द असते. श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या या गुणवत्तेला योग्य दिशा दिल्याने ढोकेश्वर विद्यालयाने याही वर्षी उज्ज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली असल्याचे प्रतिपादन अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे जेष्ठ विश्वस्त सीताराम खिलारी यांनी केले. पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल श्री ढोकेश्वर उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावी कला व विज्ञान शाखेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते.

पुढे ते म्हणाले, अनेक वर्षांची उत्कृष्ट निकालाची परंपरा विद्यालयाने कायम ठेवली आहे. ६६ वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या या विद्यालयातील अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात प्रभावी काम करत आहेत. यावेळी बारावी परीक्षेत कला व विज्ञान शाखेतील यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व पालकांचा श्री ढोकेश्वर विद्यालयाच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला.

प्राचार्य बाळासाहेब खिलारी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पर्यवेक्षक मनिषा गाडगे, भोंद्रे गावचे सरपंच अभिजित झावरे, डॉ.अरुण झावरे, शंकर शेळके, पत्रकार गंगाधर धावडे, दत्तात्रय वाळुंज, सुरेश झावरे, राजू पुरी, बाळासाहेब पवार, अशोक रोकडे, संदिप रोकडे, छबु चौधरी, कला शाखेचे समन्वयक विजय सोबले, अशोक गांगड, राजेंद्र ढोणे, पोपट जगदाळे, नितीन ढोकळे, अनिकेत बांगर, अतिष झावरे, यांच्यासह विद्यालयातील शिक्षक, शिक्षीका उपस्थित होते. सुत्रसंचलन भाऊसाहेब हिंगडे यांनी केले.

# निवडणुकांत मनसेचा झेंडा फडकवण्याचा नयन कदम यांचा निर्धार




**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.०७, सुपा (अअहिल्यानगर) :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका व सहकार क्षेत्रातील निवडणुकांमध्ये मनसे कार्यकर्त्यांनी ठोस कामगिरी करत विजयाचा झेंडा फडकवावा, असा निर्धार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अहिल्या- नगर जिल्हा संपर्कप्रमुख नयन कदम साहेब यांनी व्यक्त केला पारनेर तालुक्यातील मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक सुपा येथे जिल्हा अध्यक्ष श्री सचिन डफळ साहेब यांच्या उपस्थितीत पार पडली संघटनात्मक बांधणी, आगामी निवडणुकांची रणनीती आणि सहकार क्षेत्रातील संधी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली पक्षाची आगामी भूमिका स्पष्ट करताना नयन कदम म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मनसेची ताकद वाढवणे सहकार क्षेत्रात कार्यकर्त्यांना प्राधान्य देणे तरुण व नव्या नेतृत्वाला संधी देण- गावपातळीवर संघटन विस्तार करून जनसंपर्क वाढवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचना तालुका अध्यक्ष अविनाश पवार यांना कदम यांनी दिली. यावेळी बोलताना पवार म्हणाले स्थानिक प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडुन प्रशासनाला सर्व सामान्यांना न्याय देण्यासाठी निर्भीडपणे आवाज ऊठुन भाग पाडले जाईल आणि पारनेर तालुक्यात एक सक्षम विरोधी पक्ष ही मनसेची आगामी भूमिका असेल असे पारनेर तालुका मनसेचे तालुकाध्यक्ष अविनाश पवार यांनी स्पष्ट केले यावेळी तालुका उपाध्यक्ष सतीश म्हस्के यांची पारनेर तालुका खादी ग्रामोद्योग संघाच्या संचालकपदी निवड तसेच तालुका सचीव नारायण नरवडे यांची कडुस ग्रामपंचायत सदस्य पदी निवड झाल्याबद्दल संपर्क अध्यक्ष कदम यांनी त्यांचा सन्मान केला व अशाच प्रकारे निवडीमुळे मनसेला सहकार क्षेत्रासह स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये बळकटी मिळणार असल्याचे कार्यकर्त्यांना आवाहन करताना कदम म्हणाले की, पारनेर तालुका दूध संघ, कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये मनसे सक्षम उमेदवार उभे करेल. इच्छुक कार्यकर्त्यांनी पुढे येऊन निवडणुका लढवाव्यात पक्ष संघटना त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी राहील.

बैठकीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मनसेकडून जोरदार तयारी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. या बैठकीस जिल्हाध्यक्ष सचिन डफळ, जिल्हा उपाध्यक्ष महेंद्र गाडगे, पारनेर तालुकाध्यक्ष अविनाश पवार, तालुका सचिव नारायण नरवडे, तालुका उपाध्यक्ष विरेंद्र थोरात, अक्षय सुर्यवंशी, बाबु भैय्या कोठावळे, सुरज गोरे, निकम गजरे, सतिश म्हस्के यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अक्षराजच्या बातमीला अखेर यश; कौसडीत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरु



**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.०७, जिंतूर :** जिंतूर तालुक्यातील मोठा गाव असलेल्या कौसडी गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू गावातील तीव्र पाणी टंचाईचा प्रश्न अधोरेखित करत अक्षराज रहीम कोक्कर यांनी लावलेल्या बातमीला अखेर यश आले असून कौसडी गावासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे.गावातील नागरिकांना भेडसावत असलेल्या पाणी समस्येवर उपाययोजना व्हावी यासाठी करण्यात आलेल्या या बातमीमुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले. त्यानंतर ग्रामपंचायतीच्या पाठपुराव्याला गती मिळाली.

सरपंच मोबीन कुरेशी व जिल्हा परिषद सदस्य माणिक हरकळ पंचायत समिती सदस्य मुजाहिद कादरी यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर टँकर मंजूर झाला.टँकरद्वारे पाणीपुरवठ्याला सुरुवात होताच श्रेय लाटण्याचा पर्यंत अनेकजण करत असलेतरी त्यांना जागे करण्याचा काम मात्र दैनिक अक्षराजने केलेला आहे टँकर द्वारे सुरू करण्यात आलेल्या उद्घाटन प्रसंगी मोबिन कुरेशी, ग्रामपंचायत अधिकारी एस. डी. धरणे, ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी वर्ग, महिला मंडळ तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.या निर्णयामुळे गावकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असून, माध्यमांच्या ताकदीमुळे प्रश्न मार्गी लागल्याची भावना व्यक्त होत आहे!